## नियमीत दरखास्त क्र.२०/२०१९ मधील
## निशाणी क्र.१४ वर आदेश
**CNRNO.MHLA110005022019.**

१. सदरचा अर्ज ऋणको क्र.१ ने विनाम्हणणेचा आदेश बाजूस सारुन म्हणणे स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जास धनकोने म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविलेला आहे.

२. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर ऋणकोने मुदतीमध्ये म्हणणे दाखल केलेले नाही. सदर अर्जाच्या कथनाच्या पृष्ठर्थ सदर ऋणकोने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे केवळ नैसर्गीक न्यायाचे तत्व विचारात घेवून माझे असे मत झाले आहे की, सदर ऋणकोला बचाव मांडण्यासाठी संधी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारामधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. नि.क्र.१४ वरील अर्ज ऋणको यांच्यावर रक्कम रू.२००/– खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम ऋणकोने धनकोला पुढील तारखेपर्यंत द्यावी अथवा न्यायालयात जमा करावी.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.03.02 18:00:08 +0530

दि.०२.०३.२०२०.

(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.